# कार्यालयीन सहाय्यक (न्यायिक) लिपिक संवर्ग पदविका अभ्यासक्रम उद्घाटन समारंभ – अहवाल

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक यांच्या निरंतर शिक्षण विद्यालय (School of Continuing Education) यांच्या वतीने "कार्यालयीन सहाय्यक (न्यायिक) लिपिक संवर्ग पदविका अभ्यासक्रम" याचा उद्घाटन समारंभ रविवार, दि. ११ जानेवारी २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता विद्यापीठाच्या ऑडिटोरियम, नाशिक येथे उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मा. न्यायमूर्ती श्री. संदीपकुमार मोरे (मुंबई उच्च न्यायालय) होते. आपल्या भाषणात त्यांनी न्यायालयीन कामकाजात प्रशिक्षित, शिस्तबद्ध व नैतिक मूल्ये जपणाऱ्या कर्मचाऱ्यांची गरज स्पष्ट केली. न्यायालयीन लिपिक संवर्ग हा न्यायव्यवस्थेचा कणा असून, असा व्यावसायिक अभ्यासक्रम सुरू करणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. प्रा. डॉ. संजीव सोनवणे, कुलगुरू, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक हे होते. त्यांनी विद्यापीठाच्या सामाजिक जबाबदारीवर भर देत, न्यायालयीन व प्रशासकीय क्षेत्रासाठी उपयुक्त अभ्यासक्रम राबविण्याची भूमिका स्पष्ट केली.

या अभ्यासक्रमाची संकल्पना व पुढाकार ॲड. इंद्रभान रायते यांनी घेतला असून, न्यायालयीन सेवेसाठी आवश्यक असलेल्या कौशल्याधारित मनुष्यबळाची निर्मिती करणे तसेच यासाठी आवश्यक अभ्यासक्रम व संदर्भग्रंथ लेखनाचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले.

कार्यक्रमाचे आयोजन निरंतर शिक्षण व व्यावसायिक शिक्षण विद्यालयाचे संचालक मा. प्रा. जयदीप निकम सर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. त्यांनी विद्यापीठाच्या रोजगाराभिमुख अभ्यासक्रम धोरणावर प्रकाश टाकत, सदर पदविका अभ्यासक्रम युवकांसाठी न्यायालयीन क्षेत्रात करिअरच्या संधी निर्माण करणारा असल्याचे नमूद केले.

यावेळी मुंबई उच्च न्यायालयातील मा. न्यायमूर्ती, नाशिक जिल्हा न्यायालयाचे प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश, इतर मान्यवर न्यायाधीश, वरिष्ठ वकील, विधिज्ञ, तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या अभ्यासक्रमासाठी तयार करण्यात आलेल्या अभ्यासक्रम संरचनेवर तसेच प्रकाशित करण्यात आलेल्या संदर्भग्रंथांवर मान्यवरांनी समाधान व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. माधुरी खरजुल यांनी अत्यंत प्रभावीपणे केले. त्यांनी कार्यक्रमाची शिस्तबद्ध मांडणी करत सर्व मान्यवरांचा समन्वय साधला.

या कार्यक्रमाचे नियोजन व यशस्वी आयोजन विद्याशाखेतील शैक्षणिक संयोजक सौ. सोनाली पाटील, श्री. अक्षय विभांडीक, श्री. मनोहर पवार, डॉ. माधुरी खरजुल, विभागातील सहायक श्री. संकेत रावडे, तसेच दिपाली ठाकरे , वर्षा गुजर, सोनाली गायकर , रोशनी गायकवाड , वैभव सैंदाणे, गणेश कांबळे यांनी केले.

शेवटी आभार प्रदर्शनानंतर कार्यक्रमाची सांगता झाली. हा अभ्यासक्रम न्यायालयीन सेवेसाठी इच्छुक विद्यार्थ्यांना सक्षम व रोजगाराभिमुख बनविण्यास निश्चितच उपयुक्त ठरेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.








YASHWANTRAO CHAVAN MAHARASHTRA OPEN UNIVERSITY
SCHOOL OF CONTINUING EDUCATION
NASHIK